E/Sujay/ circular Marathi/ PA

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२५–२६)/   /२०२५

## परिपत्रक:

विषय: "वंदे मातृरम" गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त वर्षभर राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रम/उपक्रमाबाबत....

संदर्भ: १) समक्रमांकाचा दिनांक ३१/१०/२०२५ रोजीच शासन निर्णय
२) संचालक संस्कृति मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र. सीएम–२१/१/२०२५–सी & एम, दिनांक १/११/२०२५ रोजीचे पत्र.
३) उपसचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे क्र. संकीर्ण–८२२४/प्र.क्र.५०५/सां.का. ४, दिनांक ०४/११/२०२५.

मुंबई विद्यापीठ संलग्नित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/प्रमुख, मुंबई विद्यापीठाचे रत्नागिरी, ठाणे, कल्याण, सिंधुदुर्ग उपपरिसराचे संचालक यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची आनंदमठ ही कादंबरी मालिका स्वरूपात प्रकाशित झाली. वंदे मातृरम ०७ नोव्हेंबर, १८७५ रोजी अक्षय नवमीच्या दिवशी लिहिले गेले असे मानले जाते. स्वातंत्र्य चळवळीत वंदे मातृरम कोटयावधी भारतीयांचा युद्धघोष बनले. १८९६ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात वंदे मातृरम गायले. नंतर, काँग्रेसच्या बैठकीत वंदे मातृरमचे पहिले दोन श्लोक गाणे नित्यक्रम बनले. हळूहळू ते स्वातंत्र्यसैनिकांचे गीत बनले, आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारच्या घोषणेवेळी वंदे मातृरम गायले गेले. सन १९०५ बंगालच्या फाळणीविरुद्धच्या निषेधाचा वंदे मातृरम हा महत्त्वाचा भाग होता. सन १९०७ मॅडम भिकाजी कामा यांनी स्टुटगार्ट, बर्लिन येथे भारताबाहेर प्रथमच तिरंगा ध्वज फडकवला. ध्वजावर वंदे मातृरम असे शब्द लिहिलेले होते. दिनांक २४ जानेवारी, १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सविधान समेत एक निवेदन केले. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद म्हणाले की स्वातंत्र्य लढ्यातील वंदे मातृरमची महत्त्वाची भूमिका पाहता राष्ट्रगीत जन गण मन प्रमाणेच त्याला दर्जा असेल आणि त्याचा तितकाच सन्मान केला जाईल. संविधान सभेतील त्यांच्या भाषणाने वंदे मातृरमला राष्ट्रगीताप्रमाणेच दर्जा आहे हे प्रस्थापित केले आणि भारतीय जनतेला प्रेरणा देण्यातील त्याचे ऐतिहासिक महत्त्व ओळखले गेले. संदर्भाधीन पत्रान्वये सदर कार्यक्रम/उपक्रम वर्षभर पूर्ण राज्यामध्ये राबविण्यासाठी आवश्यक आहे

२/—

केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार खालील चार टप्प्यात कार्यवाही करून कार्यक्रम/उपक्रम यशस्वीपणे पार पाडावयाचा आहे.

१. पहिला टप्पा ७ ते १४ नोव्हेंबर, २०२५.

२. दुसरा टप्पा १९ नोव्हेंबर, २०२५ ते २६ जानेवारी, २०२६ (प्रजासत्ताक दिन अंतर्भूत)

३. तिसरा टप्पा ७ ते १५ ऑगस्ट, २०२६ (हरघर तिरंगा या उपक्रमा अंतर्गत)

४. चौथा टप्पा १ ते ७ नोव्हेंबर, २०२६ (समारोप समारंभ)

केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने दिनांक ०४/११/२०२५ रोजी झालेल्या दूरदृश्य (Video Conferencing) प्रणालीद्वारे बैठकीमध्ये दिलेल्या सूचनेस अनुसरून कार्यवाही करणे आवश्यक आहे. (प्रत सोबत जोडत आहे.)

समुदायिक गायनाची वेळ ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता देशभरात 'वन्दे मातृरम्' च्या सामुदायिक गायनासाठी (Mass Singing) वेळ निश्चित करण्यात आली आहे. डिजिटल सक्रियकरण (Digital Activation) बाबत माहिती सोबत जोडीत आहे.

मुंबई—४०० ०३२.
दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रत:—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.